PUNE RESEARCH WORLD ISSN 2455-359X
AN INTERNATIONAL JOURNAL OF INTERDISCIPLINARY STUDIES VOL 4, ISSUE 1

# विल्यम कॅरी :- एक व्रत मिशनरी चळवळीचे

**वळवी विश्वास गोरखनाथ**
संशोधक विध्यार्थी सामाजिक शास्त्रे प्रशाळा,
इतिहास विभाग,
कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव
महाराष्ट्र भारत

## गोषवारा:-

विल्यम कैरी *म्हणतात "न्यायी आहे तो देव,अन ख्रिस्तावर विश्वास ठेवणाऱ्याला न्यायी असायला हवं,मी,तुम्ही आपल्यावर जबादारी आहे ती.कारण आपल्यात व इतरात फरक नसेल तर जो आपल्यात वावरतो त्यास ख्रिस्ताची ओळख कशी होईल."* देवाची ख्रिस्ती व्यक्ती अथवा संस्था या जगापासून वेगळी आहे,पण जगात कार्यरत आहे. ख्रिस्तात निष्पाप जीवन जगून जगिक लोकात आपली धार्मिकताची मुळे सामान्य लोकांत रुजविण्याचे कार्य करते.भारतात आध्यात्मिक शिक्षणाची मूळे जरी प्राचीन काळात जात असली तरी आधुनिक शिक्षणाचा पाया ख्रिस्ती मिशनऱ्यांनीच टाकला हे निर्विवाद सत्य आहे. भारतात आलेल्या डॉ. विल्यम केरी. यांनी आपल्या कार्यकर्तुत्वाने भारतात सुधारणांचा नवीन प्रवाह आणला. कॅरीचा जन्म एका चांभार कुटुंबात झाला,चपले शिवणारा कॅरी पुढे जाऊन आधुनिक मिशनरी चळवळीच्या जनक म्हटला गेला,कारण देव केरीच्या दर्शनाला चालवीत होता,देवाच्या सामर्थ्याने विल्यम केरीने यांनी जवळ-जवळ चाळीस भाषेत दोन लाख प्रतीत पुस्तकाची छपाई करून एक नवीन इतिहास रचला,भारतीय विषयांचे आणि बायबलचे शिक्षण संपूर्ण भारतात स्थानिक भाषेत शिक्षणाने कोरले गेले,विल्यम केरींने खऱ्या अर्थाने संपूर्ण भारतात शिक्षणाचा पाया घालून दिला,विलियम केरीने बंगालमध्ये सतीप्रथा,केशवपन,बालविवाह या अनिष्ट प्रथा आणि परंपरांवर प्रहार केला,आणि ख्रिस्ताच्या संदेशातून सामान्य लोकांतील अंधश्रद्धा मिटवून अनेक सुधारणा घडवून आणल्या.

## प्रस्तावना:-

विल्यम कॅरी हे भारतात आलेले पहिले मिशनरी होतेच पण त्याचबरोबर जागतिक ख्रिस्ती मिशनरी चळवळीच्या पाया रोवणारे महान ख्रिस्ताचे दूत होते.ज्या काळी ख्रिस्ती समाज चर्च मधून बाहेर निघायला तयार नव्हता,ज्यावेळी ख्रिस्ती समाज सुवार्तेची द्वारे बंद करून देवाची भक्ती करीत

होता,ज्यावेळी ख्रिस्ती समाज हा फक्त बायबलच्या सैद्धांतिक वादात अनेक पंथ-उपपंथ निर्माण करून वादविवाद करीत होता.अशावेळी विल्यम कॅरी आपल्या चर्चमधून,आपल्या घराच्या द्वाराबाहेर आणि सैद्धांतिक वादातून पंथ उपपंथातून बाहेर जिथे ख्रिस्त पोहचला नाही अशा ठिकाणी ख्रिस्ताच्या प्रेमाचा वारसा द्यायला,पापातून लोकांना सोडवायला,शिक्षण,आरोग्य,आणि पवित्रशास्त्राच्या वारसा आणि मिशनरी चळवळीचे व्रत घेऊन विल्यम कॅरी भारतात पोहचला.भारतात आध्यात्मिक शिक्षणाची मूळे जरी प्राचीन काळात जात असली तरी आधुनिक शिक्षणाचा पाया ख्रिस्ती मिशनऱ्यांनीच टाकला हे निर्विवाद सत्य आहे. भारतात आलेल्या डॉ. विल्यम केरी. यांनी आपल्या कार्यकर्तुत्वाने भारतात सुधारणांचा नवीन प्रवाह आणला. कॅरीचा जन्म एका चांभार कुटुंबात झाला,चपले शिवणारा कॅरी पुढे जाऊन आधुनिक मिशनरी चळवळीच्या जनक म्हटला गेला,कारण देव केरीच्या दर्शनाला चालवीत होता,देवाच्या सामर्थ्याने विल्यम केरीने यांनी जवळ-जवळ चाळीस भाषेत दोन लाख प्रतीत पुस्तकाची छपाई करून एक नवीन इतिहास रचला,भारतीय विषयांचे आणि बायबलचे शिक्षण संपूर्ण भारतात स्थानिक भाषेत शिक्षणाने कोरले गेले,विल्यम केरींने खऱ्या अर्थाने संपूर्ण भारतात शिक्षणाचा पाया घालून दिला,विलियम केरीने बंगालमध्ये सतीप्रथा,केशवपन,बालविवाह या अनिष्ट प्रथा आणि परंपरांवर प्रहार केला,आणि ख्रिस्ताच्या संदेशातून सामान्य लोकांतील अंधश्रद्धा मिटवून अनेक सुधारणा घडवून आणल्या.विल्यम केरीने चाळीस भाषेत जे साहित्य निर्माण केले.त्यामुळे भारतात स्थानिक भाषेत सुवार्तेची लाटच आली,आणि भारतात ख्रिस्ती मिशनरी चळवळ फोफावली.केरी त्यांच्यापासून प्रेरणा घेत पुढे ब्रिटिशांनी आणि लॉर्ड वुडसने इंग्रजी शिक्षणाची सुरुवात केली.१८१३ च्या चार्टर अक्टने ख्रिस्ती मिशणाऱ्यांना खेड्यापाड्यात शिक्षणाची शिकवन देण्याबाबत परवानगी देण्यात आली, आणि ख्रिस्ती मिशनऱ्यांनी शिक्षण,आरोग्य आणि सामाजिक सुधारणांचे जणू व्रतच घेतले. बर्थलोमस जिगंबलग,तसेच विल्यम केरी,आणि अनेक ख्रिस्ती मिशनऱ्यांच्या प्रेरणेतून आज मिशनरी चळवळ हि न थांबणारी झालेली आहे.

## विल्यम कैरीचा जन्म आणि मिशनरी कार्याची सुरुवात:-

अरुण गद्रे म्हणतात ''फ्रांस व ब्रिटेनमध्ये सारखी परिस्थिती असताना फ्रान्समध्ये रक्तरंजित क्रांती झाली,जीन आपलीच पिल्ल खाल्ली.मात्र शेजारी ब्रिटनमध्ये क्रांती झाली नाही,याच एकमेव कारण होते,पन्नास वर्षे लोकांना पापापासून दूर व्हा अस सांगत ख्रीस्ताबरोबर चालणारा जॉन वेस्ली''१ विल्यम कॅरी यांना जॉन वेस्ली कडून इंग्लंडमध्ये ख्रिस्ताचा वारसा मिळाला होता.पण जॉन वेस्ली आणि त्याचे सहकारी हे चर्चच्या बाहेर जायला तयार नव्हते त्यांनी स्वताला आणि लोकांना एका बंदिस्थ खोलीत बंद करून ठेवले होते.सुवार्ता,ख्रिस्तसंदेश,पवित्रशास्त्र या गोष्टी बाहेर द्यायला तयार नव्हते अशा परिस्थितीत विल्यम कॅरी यांच्या जन्म १७ ऑगस्ट १७६१ मध्ये पोल्स्परी इग्लंड येथे झाला.चाम्भाराचे शिक्षण घेऊन त्या व्यवसायात तो गुंतला,पुढे बाप्टीस्ट चर्चच्या सदस्य बनला आणि प्रभूच्या कार्यासाठी स्वत:चे पूर्णसमर्पण करून मार्शमन सोबत भारतात ख्रिस्ताचा संदेश घेऊन आला.भारतात येऊन विल्यम कॅरी यांना कडून चुकले,कि भारतातील समाजव्यवस्था जटील असून

आरोग्य शिक्षण यांच्या अभाव आहे त्यामुळे त्यांना प्रथम शिक्षण,आरोग्य देणे गरजेचे आहे,त्याच्या वाईट प्रथा आणि परंपरा या कशा चुकीच्या आहे हे दाखविणे अत्यंत गरजेचे आहे.आध्यामिक उद्धाराबरोबर त्यांच्यात शारीरिक रोगराई आणि अज्ञान देखील दूर करणे हे एका ख्रिस्ती मिशनरीचे आध्य कर्तव्य आहे.म्हणून विल्यम कॅरी यांनी बंगालमध्ये अनेक सामाजिक सुधारणा घडवून आणल्या. *डॉ जॉन मथाई* म्हणतात "दोनशे वर्षापूर्वी भारतात आलेल्या,राजा राममोहन रॉय अगोदर तीस वर्ष सतीबंदीसाठी प्रयत्न करणाऱ्या,बंगाली व मराठी भाषेचे व्याकरण तयार करणाऱ्या,साख्य तत्वज्ञानाच इग्रजीत भाषांतर करणाऱ्या या ख्रिस्ती मिशनरी विल्यम कैरीन मला झपाटून टाकल"२

## वेगवेगळ्या विषयात पुस्तके छापून सामान्य वर्गाला शिक्षित केले:-

विल्यम कॅरी यांनी आपल्या कार्याने मिशनरी चळवळीच्या न थांबणारा प्रवाह निर्माण केला.डॉ सुभास पाटील म्हणतात 'विल्यम कॅरीचा धर्मप्रचार हा मूळ हेतू असला,तरी त्याने अनेक क्षेत्रात सामाजिक कार्य केले आहे.सेरामपुर मिशन प्रेसमधून ३४ वर्षात ४० भाषेत पुस्तकांच्या दोन लाखाहून अधिक प्रती काढल्या.या पुस्तकात ख्रिस्चन धार्मिक साहित्याप्रमाणेच अनेक शालेय पुस्तेकेही होती.त्याने वनस्पतीशास्त्राचाही अभ्यास केलेला होता.त्यामुळे त्याने रोक्सबर्ग फ्लोरा ऑफ इंडिया हा उद्यानशास्त्रातील अभिजात मानला गेलेला ग्रंथराज प्रकाशित केला.१०००० विध्यार्थी असलेली शाळा सेरामपुर येथे चालविली.शिक्षक प्रशिक्षण संस्था आणि एक संग्राहलय त्याने सुरु केले."3 विल्यम कॅरी यांनी आपल्या कार्याने सामाजिक सुधारणा घडवून आणल्याच पण त्याच बरोबर,वनस्पतीशास्त्र,मराठी,हिंदी,आणि उर्दू तसेच भारतातील अनेक स्वदेशी भाषेत पवित्रशास्त्र बरोबर शिक्षणाच्या अनेक विषयावरील पुस्तके देखील निर्माण करून लोकांना शिक्षित केले.

## विल्यम कॅरी यांचे मिशनरी चळवळीचे घटक:-

विल्यम कॅरी यांनी ख्रिस्ती मिशनरी चळवळी बरोबरच समाजाला आरोग्याच्या आणि शिक्षणाच्या संधी निर्माण करून दिल्या,सतीप्रथा असो कि बालविवाह,केशवपन त्यांनी कडाडून विरोध केला.आणि ब्रिटीश सरकारच्या मदतीने बंद केल्या आज कॅरी भारतात फक्त एक मिशनरी म्हणून ओळखले जात नाही तर मुद्रण कलेचे जनक म्हणून देखील ओळखले जातात "रेव्ह केरी हे भारतातील अनेक भाषातील मुद्रणकलेचे जनक म्हणून ओळखले जातात.मराठी भाषेशिवाय इतर अनेक देशी भाषातील पहिले पुस्तक छापण्याचे श्रेय या बाप्टीस्ट मिशनच्या धर्मगुरूश दिले जाते.सतीप्रथेविरुद्ध आवाज उठवून या अनिष्ठ प्रथेवर कायद्याने बंदी आणण्याचे श्रेय राजा राजा-राममोहन रॉय यांच्याबरोबर विल्यम केरी यांना दिले जाते...विविध क्षेत्रात पायाभूत स्वरूपाचे योगदान करणाऱ्या भारतातील ख्रिस्ती मिश्णाऱ्यामध्ये रेव्ह.विल्यम केरी यांचे स्थान आगाडीवर आहे."४ विल्यम करी भारतीय सुधारणांचे खरे जनक आणि कर्ते आहे.त्यांच्या कार्याच्या पाळेमुळामुळे आज भारतात अनेक सुधारणाना व्हाव मिळालेला आहे.भारतीय ख्रिस्ती मिशनरी संस्था आणि मिशनरी कार्य विल्यम कॅरीच्या प्रेरणादायी कार्यातून ख्रिस्ताच्या संदेश सामाजिक सुधारणांचा माध्यमातून आज तळागाळातील लोकांपर्यंत पोहचून

कार्यरत आहे."हिंदुस्थानात मुली आणि महिलांना सर्वप्रथम शिक्षण सुरु करण्याच्या मनहु रेव्ह केरीकडे जातो.ज्या काळात गरीब लोक सावकारीमुळे पूर्णतः उध्वस्त होत असत अशा काळात या मिशनाऱ्याणे हिंदुस्थानात सर्वप्रथम लोकाची बचत बँक सुरु केली.रामायण आणि महाभारत या श्रेष्ठ महाकाव्याचे सर्वप्रथम इग्रीजीत भाषांतर करण्याच्या बहुमानही रेव्ह केरी यांना मिळाला.छापण्यासाठी लागणारा कागद भारतात त्यांनी सर्वप्रथम बनवला याशिवाय इतरही क्षेत्रात रेव्ह केरीनी आपल्या कर्तुत्वाचा ठसा उमटवलेला आहे."५ भारतात ख्रिस्त प्रचारित करीत असतांना विल्यम कॅरी यांनी सामाजिक आणि शैक्षणिक सुधारणाचे नवचैत्यन आणि ज्योत पेटवून दिली.अंधकारात असणाऱ्यांना शिक्षणाचा प्रकाश दिला,अज्ञानी लोकांना ज्ञान दिले,रोगराई लोकांसाठी आरोग्याच्या सुविधा निर्माण केल्या.

| *अनु.क्र* | *जुना/नवा/करार* | *पवित्रशास्त्र* | *भाषा* | *कालखंड* |
|---|---|---|---|---|
| १ | नवा करार | पवित्रशास्त्र | बंगाली | १८०१ |
| २ | नवा करार | पवित्रशास्त्र | संस्कृत | १८०८ |
| 3 | संपूर्ण पवित्रशास्त्र | पवित्रशास्त्र | बंगाली | १८०९ |
| ४ | नवा करार | पवित्रशास्त्र | मराठी | १८११ |
| ५ | नवा करार | पवित्रशास्त्र | पंजाबी | १८१५ |
| ६ | नवा करार | पवित्रशास्त्र | संस्कृत | १८१८ |
| ७ | जुना करार | पवित्रशास्त्र | मराठी | १८२० |
| ८ | पवित्रशास्त्र | शब्दकोश | बंगाली-इग्रजी | १८२५ |

## विल्यम कॅरी बद्धल काही ऐतिहासिक मते:-

विल्यम कॅरीनी आपल्या कार्याने संपूर्ण भारतात जनजागृतीचे कार्य सुरु केले.आणि सर्वांगीण सुधारणा घडविण्याच्या पुरेपूर प्रयत्न केला.डॉ.म.पिंगे.लिहितात "केरीची कोकणीतील व मराठीतील बायबल विषयक पुस्तके धर्मप्रचारासाठी व लोकांचे अज्ञान नाहीसे होऊन त्यांना ख्रिस्ती धर्म कळावा म्हणून जरी लिहिली गेली होती,तरी त्यामुळे भाषाविषयक अभ्यासाला चालना मिळाल्याखेरीज राहिली नाही"६ विल्यम कॅरी यांच्या सामाजिक सुधारणा,धर्मविषयक कार्य,संशोधन आणि भाषा विषयातील कार्य हे अमूल्य आहे.मध्ययुगीन भारतातील आणि आधुनिक युगाच्या खरा मिशनरी चळवळीचा पिता म्हणजे विल्यम कॅरी हे त्याच्या कार्याने त्याने सिद्ध केले.

पंडित जवाहरला नेहरू आपल्या डिस्कवरी ऑफ इंडिया या ग्रंथात म्हणतात "The printing og books and newspapers broke the hold of classics and immediately prose literatures in the provincial languages began to develop.the early Christian missionaries,especially of the Baptist mission at serampur.helped in the process greatly.the first private priting presses were established by them and their efforts to translate the Bible in to prose versions of the Indian languages met with considerable success.there was no difficutty in dealing with the wellknown and established languguages,but the missionaries went the further and tackled some of the minor and undeveloped languages and gave them shake and form,compliling grammers and dictionaries for them.they even Laboured at dialects of the primitive hill and forest tribes and reduced them to writing."7 पंडित नेहरू विल्यम कॅरीला भारतातील सुधारणांचा कर्ता सुधारक म्हणून मान देतात.भारतात असलेल्या शिक्षण,आरोग्य आणि आर्थीक दुर्बलता,या घटकांना कमी करून त्यात क्रांती आणण्याचे कार्य करणारे विल्यम कॅरी भारतातील प्रथम आणि खंदे पुरस्कर्ते होते.विल्यम कॅरी यांनी आपले सर्वस्व वेचून परकीय देशात जाऊन गोर-गरीब,शिक्षणापासून वंचित असलेला समाज,रोगराईमुळे असंख्य बळी पळणारा घटक.इत्यादीसाठी आपले जीवन समर्पित करून दिले,त्या विल्यम कॅरीचा मनापासून सन्मान असो...

## संदर्भग्रंथसुची:-

१) असे होते विल्यम कॅरी,डॉ अरुण गद्रे,राजहंस प्रकाशन,प्रथमावृत्ती,पुणे,२०११,पृ क्र-५

२) असे होते विल्यम कॅरी,डॉ अरुण गद्रे,राजहंस प्रकाशन,प्रथमावृत्ती,पुणे,२०११,पृ क्र-४

३) मराठी ख्रिस्ती साहित्य उगम आणि विकास,डॉ सुभास पाटील,चेतक बुक्स प्रकाशक,कुणाल हजेरी,प्रथमावृत्ती,२०१६,पुणे,पृ.क्र.१०२

४) ख्रिस्ती मिशणाऱ्याचे योगदान,सुगावा प्रकाशन,प्रथमावृत्ती,पुणे ,२००३,पृ-क्र-९०

५) ख्रिस्ती मिशणाऱ्याचे योगदान,सुगावा प्रकाशन,प्रथमावृत्ती,पुणे ,२००३,पृ-क्र-९६

६) उपरोक्त,पृ.क्र.१०२

७) उपरोक्त पृ.क्र.९७